

॥ समाजाय इदम् न मम् ॥

आहुति

स्थापना : ११ जून १९६६

संस्थापक : स्व. वसंतराव त्रिवेदी

₹ १५०

दीपावली विशेषांक - २०२४



विशेष मुलांचा लाखमोलाचा

सहवास



समाधान सावंत

संवेदनशील मनाचे एक शिक्षक मतिमंदांची होणारी अवहेलना पाहून व्यथित होतात आणि त्यातून 'सहवास' सारख्या विशेष मुलांच्या निवासी प्रकल्पाची स्थापना होते. जळगावच्या एरंडोल तालुक्यात सोनबर्डी या छोट्या गावातील संस्थेच्या वाटचालीचा संस्थापकांनी घेतलेला आढावा.

'सहवास'चं विश्व उभं राहण्याआधी माझं आयुष्य सुरक्षित आणि सामान्यपणे सुरू होतं. बी.ए. बी.एड. नंतर बदलापूरमधल्या एका शाळेत मी विशेष शिक्षक म्हणून नोकरी करत होतो. लग्नाआधी वयाच्या २४ व्या वर्षापासूनच माझं मतिमंद मुलांसाठी म्हणजेच विशेष मुलांसाठी कार्य सुरू झालेलं होतं. पुढे योग्यवेळी माझ्या पालकांनी माझं लग्नही लावून दिलं. एकंदरच माझं जीवन आनंदात आणि समाधानाने सुरू होतं. मात्र, एकेदिवशी अचानक घडलेल्या एका प्रसंगाने मला मोठा

धक्का बसला. माझं गाव जळगाव जिल्ह्यातलं एरंडोल तालुक्यात आहेत. गावाचं नाव, सोनबर्डी. या माझ्या गावात काही तरुण मुलं एका मानसिकदृष्ट्या आव्हानात्मक मुलाला त्रास देत होती. त्या मुलाचं नाव होतं शशिकांत वाणी. आजूबाजूचे लोक या दृश्याकडे फक्त मनोरंजनाच्या दृष्टीने पाहत होते. मात्र, त्या केविलवाण्या दृश्याने मी खूप व्यथित झालो. मी लागलीच तिथे जाऊन हस्तक्षेप केला आणि त्या मुलाला वाचवले. तो प्रसंग तिथे उपस्थित प्रत्येकासाठी संपला आणि त्यांच्या विस्मृतीतही गेला. मात्र, माझ्या मनावर खोल जखम झाली होती. माझ्या मनात खूप चल-बिचल सुरू झाली. जे काही घडलं तो प्रसंग मला सतावत होता. अखेर, तेव्हा माझ्या मनाने यावर तोडगा काढायचा निर्णय घेतला. अक्षरशः मधाचा झरा काळजात पाझरावा आणि त्यातून गोड अंर्त आवाज बाहेर यावा असंच काहीसं घडलं. शशिकांत आणि त्याच्यासारख्या मुलांना अशा अमानवीय परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी मदत होईल असं काहीसं काम करण्याचा तो निर्णय होता. मी शशिकांतला थेट आमच्या घरीच घेऊन आलो. माझ्या पालकांनीही त्याच्या घरी आणण्याच्या माझ्या कृतीला लगेच संमतीही दिली. शशिकांतसारख्या मुलांसाठी संस्था निर्माण करण्याचा मानस आम्ही केला. माझे हे पहिले-वहिले प्रयत्न हळूहळू 'सहवास'च्या रुपाने आकाराला आले.

'सहवास'च्या या कल्पनेने आमच्या कुटुंबाला प्रेरित केलं आणि मी आमच्या गावात एक योग्य जागा शोधू लागलो. जिथे आम्हाला आमच्या लहान सहवासरूपी रोपट्याचा विकास करता येईल. मी माझी चांगल्या पगाराची नोकरी सोडली आणि पूर्णपणे सहवासचं उज्वल भविष्य पाहण्यात मग्न झालो. मी सोनबर्डीत एका फार्मवर सहवास उभं केलं. मी ती जागा विकत घेतली आणि एक लहानसं पुनर्वसन केंद्र बांधलं. जून २०१४ मध्ये सहवासची स्थापना झाली. इथे दाखल झालेल्या मुलांच्या पालकांमुळे तोंडी प्रसिद्धीही झाली. यात त्यांना समाधान मिळत होतं आणि अधिकाधिक पालकांनी त्यांच्या मुलांना दाखल करायला सुरुवात केली आणि आम्हाला आशीर्वाद दिला. आता या मुलांची काळजी घेण्यासाठी सहाय्यक, नर्सेस ठेवण्याची आर्थिक ताकद तेव्हा माझ्याकडे नव्हती. माझे वयोवृद्ध पण खमके पालक माझ्यासोबत उभे राहिले आणि त्यांनी पूर्णवेळ सगळ्यांच्या स्वयंपाकाची सर्व जबाबदारी घेतली. माझे वडील हिलाल सावंत आणि रंजनाबाई सावंत यांनी अगदी मायेने त्यांच्यासाठी जेवण बनवण्यास सुरुवात केली.

माझी पत्नी मनिषा हिने आनंदाने २४ तास मुलांची काळजी घेण्याची जबाबदारी स्वीकारली. तर, सर्वात महत्त्वाचं म्हणजे माझे भाचे वितेश खैरनार, हर्षल वारुळे आणि माझा भाऊ विश्वनाथ सावंत यांनी या उद्दीष्टाला पाठिंबा देण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचा निश्चय केला. आश्चर्य म्हणजे माझी अगदी लहान मुलगी अभिद्न्या देखील या गोड मुलांना आनंद देते.

जर तुम्ही काही चांगलं काम सुरू केलं, तर तुम्हाला नेहमीच मोठा पाठिंबा मिळतो आणि हे सर्व काही एका सामर्थ्यवान ध्येयात बदलू शकतं हे तेव्हा मला पटलं. मी एक छोटं पाऊल उचललं आणि सर्वांकडून मोठा पाठिंबा





मिळाला आणि सहवास आता गोड सुगंधाने फुलत आहे.

माझा परिवार, माझे पालक आणि आम्ही सर्व येथे मुलांसोबत राहतो. आम्ही जे खातो, तेच त्यांनाही खाण्यासाठी देतो. आम्ही जो आनंद घेतो त्यातून त्यांनाही आनंद मिळेल असा प्रयत्न करतो. आम्ही त्यांच्यासोबत हसतो, त्यांच्या दुःखात सहभागी होतो. जर त्यांच्यातील एकही जण दुःखी झाला तर आम्ही झोपूही शकत नाही. आम्ही एकमेकांच्या ऊर्जेसोबत जगतो. आम्ही सह-अस्तित्वात राहतो. आम्ही एकटे जगू शकत नाही आणि म्हणून याला सहवास म्हटलं आहे.

सहवासमध्ये सध्या विशेष मुलं म्हणजे १८ वर्षांवरील प्रौढ मतिमंद मुले आहेत. याखालील लहान मुले आमच्याकडे नाहीत. तसेच, १५ मुलं प्रतिक्षेत आहेत. मात्र, आर्थिक मदत सध्या मिळत नसल्याने त्यांचा प्रवेश होऊ शकलेला नाही. आम्ही या मदतीच्या प्रतिक्षेत आहोत.

आमच्याकडे प्रवेशासाठी लागणारे शुल्क खूप कमी आहे. पण औषध, राहण्याच्या सुविधा, खाद्यपदार्थ, खेळ, मनोरंजन, आरामदायी खोल्या आणि व्यावसायिक संबंधित कामे यावर जो खर्च होतो त्याला तुम्ही एखादा चमात्कारच समजावे. कारण, जे लोक आम्हाला भेटायला येतात ते आम्हाला मदत करतात. त्यांच्या मदतीमुळेच आणि आमच्या मुलांमधल्या उर्जेमुळेच आम्ही पुढे जात आहोत. ही मुले मुंबई, ठाणे, नवी मुंबई, अमरावती यांसारख्या शहरांमधून येतात. मात्र, यातली ११ मुले ही अत्यंत गरीब आणि छोट्या गावांमधून येतात. त्यांच्या पालकांना त्यांच्या मुलांसाठी पैसे देणे कठीण जाते. बरीचशी मुलं अनाथ आहेत. काहींचे आई-वडील म्हातारे आहेत. पण सहवास या सर्व गोष्टी खंबीरपणे हाताळतं आणि मुलांचं संगोपन करतं.

मी नेहमीच आपल्या संस्थेतील मुलांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपाय शोधण्याच्या प्रयत्नात असतो. निधीची वारंवार कमतरता असूनही, महत्त्वाची कामे पूर्ण करण्यासाठी सतत पुढे जात राहतो आणि कठीण परिस्थितीतही संस्थेला आवश्यक गोष्टींचा पुरवठा करत राहतो. ही सगळी स्वप्न पूर्ण करताना अडचणीही येत असतात. अशीच एक अडचण म्हणजे इथली पाणी समस्या गंभीर आहे. आमचा जळगाव जिल्हा हा कोरड्या भागात आहे. प्रत्येक उन्हाळ्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण होते आणि मुलांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणे कठीण होऊन बसते. आमच्याकडे नगरपालिकेकडून दैनंदिन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नाही. आमच्या पाण्याच्या टाकीला दोन आठवड्यांमध्ये एकदाच पाणी येतं. या परिस्थितीत दीर्घकाळ टिकणे कठीण असल्याने पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करतो आहोत. मे २०२४ मध्ये, आम्ही एक नवीन बोअरवेल ७०० फूट खोल खोदली. सुरुवातीला ५ मिनिटे पाणी दिसले, पण लगेचच बोअरवेल कोरडी झाली. कारण भूगर्भातील पाणी पातळी घटलेली आहे आणि ही आमच्या इथली समस्या आहे. बोअरवेलसाठी केलेला मोठा आर्थिक खर्च, पंप, पाईपिंग आणि केबल्स यावर केलेले गुंतवणूक सपशेल अपयशी ठरली. त्यामुळे मुलांसाठी प्यायचे पाणी उपलब्ध करणे कठीण झाले आहे. आता पुढील उपाय म्हणजे वर्षा जलसंधारण प्रणाली म्हणजेच मोठा रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प उभारणे. या योजनेचा उद्देश म्हणजे बोअरवेलमध्ये गाळलेले पाणी टाकून भूजल पातळी सुधारणे हा आहे. मात्र, या कामासाठी अधिक निधी आवश्यक आहे आणि सध्या पावसाळा संपेपर्यंत हे काम थांबलेले आहे.

पाण्याच्या समस्येशिवाय, आणखीही काही आव्हाने आहेत. काही मुले सहवासमध्ये प्रवेशासाठी प्रतीक्षा करत आहेत, परंतु सध्या त्यांचा प्रवेश थांबवण्यात आला आहे. कारण मुलांच्या किमान गरजा पूर्ण करणे अधिकाधिक कठीण होत



चालले आहे. सहवासमधील सध्याची इमारत पूर्णपणे वापरली जात असल्याने अतिरिक्त मुलांसाठी सध्या जागा नाही. त्यामुळे आम्ही ३२ हून अधिक मुलांसाठी सध्याच्या सुविधेचा विस्तार करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. आमच्या साधनसंपत्तीपेक्षा जास्त मुलांचे पालनपोषण करणे आम्हाला सध्या शक्य नाही, पण किमान ६० मुलांपर्यंत आम्हाला आमची क्षमता वाढवायची आहे.

पावसाळ्यानंतर प्रस्तावित नवीन इमारतीचे बांधकाम करण्याची योजना असून त्याचा सुबक प्रतिआराखडा आम्ही तयार केला आहे. परंतु यासाठी आवश्यक मदत मिळाल्यासच हे काम होऊ शकते. आम्ही या कामासाठी मदत देऊ शकणाऱ्या शुभचिंतकांच्या सध्या प्रतिक्षेत आहोत. कारण, सहवासचे इन्फ्रास्ट्रक्चर वाढवण्याची तातडीची गरज आहे. जेणेकरून अधिक गरजू आणि गरीब मुलांना प्रवेश मिळू शकेल. प्रस्तावित विस्तारित इमारतीच्या आराखड्यासह अंदाजे खर्च तयार आहे. सुदैवाने, आमच्याकडे मोठी जागा उपलब्ध आहे. जिथे ही विस्तारित इमारत ऐसपैस उभी राहू शकेल. त्यामुळे जागेच्या खर्चाबद्दल सध्या चिंता करण्याची गरज नाही.

सहवासाची स्थापना करताना आम्ही काही उद्दीष्ट बाळगली. यातले प्रमुख उद्दीष्ट असे की, ग्रामीण भागातील गरीब पालकांचे विशेष मूल हे जगण्यास सक्षम व्हावे आणि त्याने आत्मसन्मानाने आपले जीवन जगावे. त्यांना सामान्य आयुष्यात कमीत-कमी अडचणींचा सामना करायला लागावा असं आम्हाला वाटतं. त्याचबरोबर, सर्व ग्रामीण गरीब पालकांच्या विशेष बालकांना आत्म-देखभाल, मनोरंजक वातावरणात वाढण्यास सक्षमता प्रदान करणे, बाह्य खेळ, आरोग्यदायी आहार, संवादात्मक सामाजिक संस्कृती आणि व्यावसायिक शिक्षण मिळवून देणे, सामान्य नागरिकासारखे जीवन जगणे त्यांना सुसह्य व्हावे यादृष्टीने आम्ही प्रयत्नशील राहतो.

आमच्या या उद्दिष्टांचा, मिशन पूर्ण करण्याचा किंवा मूल्यांचा हेतू हाच आहे की या मुलांना समाजाने स्वीकारावे आणि समाजाने त्यांना स्वीकारायचं असेल तर त्यासाठी त्या मुलांना सक्षम करणं हेच आवश्यक आहे. आम्ही त्यांना मतिमंद म्हणण्यापेक्षा इथे विशेष बालक म्हणून संबोधतो. तसेच आम्हाला असेही दिसून आले आहे की सहवासमध्ये, विशेष बालक थोड्या उच्च पातळीवर विकसित होऊ शकतो आणि समाजात स्वीकारार्ह बनू शकतो. जेव्हा त्यांना हा आत्मविश्वास मिळतो, तेव्हा आम्ही त्यांना काहीतरी सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देतो. थोड्याफार शारिरीक अडचणींसह ही मुलं आपली कामं सक्षमपणे करताना दिसून आली आहेत. यातून एक महत्त्वाची आणि काहीशी भावुक ठरणारी गोष्ट पुढे आली आहे. ती म्हणजे आत्मसन्माने जगणं काय असतं? ते या मुलांना कळू लागतं आणि त्याची आपण अनुभूती घेणं हे खरंच भावुक करणारं आहे.

ही मुलं `Special Intellectual' आहेत असं आम्ही मानतो. जरी त्यांना बौद्धिक क्षमतेच्या बाबतीत काही मर्यादा असल्या तरी हे विशेष मित्र चांगलं जीवन जगू शकतात. त्यामुळे, त्यांना समाजाचा एक जबाबदार भाग बनवणं आपल्याला आवश्यक असल्याचं आम्ही मानतो. मेंदूच्या विकास क्षमतेच्या पातळीवर त्यांना मर्यादा जरी असल्या तरी या सर्व अडचणींवर मात करून ते विकसित होऊ शकतात. म्हणूनच, हे मित्र खरोखरच `Special Intellectual' आहेत.

बौद्धिक अपंगत्व आणि उपाय

ही एक अशी स्थिती आहे जी काही व्यक्तींमध्ये संवादात्मक प्रतिक्रियांच्या किमान पातळीवर शिकण्याच्या आणि स्वीकारण्याच्या वैयक्तिक मर्यादांच्या रूपात दिसते. वैद्यकीयदृष्ट्या IQ 70 च्या खाली असलेल्या व्यक्तींचा विकास

जवळजवळ थांबतो आणि अशा व्यक्तींना विविध प्रकारच्या मदतीसाठी सतत लक्ष देणे आवश्यक ठरते. काहीजण थोड्या चांगल्या स्तरावर विकसित होतात आणि स्वत:ची दैनिक कामे करू शकतात. जसे की, स्वत:च्या हाताने खाणे, जेव्हा त्यांना भूक किंवा पाण्याची आवश्यकता असते तेव्हा इशारा करणे आणि शौचालयाला जाण्याची खूण करणे. काही जण तर ही कामे कोणाच्याही मदतीशिवाय करू शकतात.

बरेचदा या मुलांच्या विकासाची गती एका वयोमानानुसार थांबते आणि जीवन चालू राहते. अशावेळी ते कुटुंबाच्या सदस्यांवर अवलंबून राहतात. कालांतराने पालक वृद्ध होतात आणि त्यांची शारीरिक शक्ती कमी होते. कुटुंबातील सदस्य कमी होतात आणि नंतर कुटुंबातील सदस्यांसाठी या वयस्कर व्यक्तीची काळजी घेणे कठीण होते. त्यामुळेच अशा मुलांना विशेष मुलांच्या केंद्रात किंवा शाळेत पाठवणे आवश्यक आहे. सामान्यत:, एका दिवसाची काळजी घेणारी केंद्रं म्हणजेच डे-केअर सुविधा बऱ्याच आहेत. मात्र, 24 X 7 काळजी घेऊ शकतील अशी केंद्र कमी आहेत. म्हणूनच आम्ही अशा मुलांसाठी आणि मोठ्यांसाठी हे केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेतला. कारण, 'अपंगता म्हणजे असमर्थता नाही' यावर आमचा ठाम विश्वास आहे. आपण एकत्रितपणे पालकांमध्ये आणि समाजात जागरूकता निर्माण करू शकतो हे सूत्र आम्ही इथे मानतो. म्हणूनच जळगावमध्ये आमच्या राहत्या गावी आम्ही असं केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला. जेणेकरून आम्हालाही या सगळ्या सुविधा उभारणं सोपं गेलं. थोडक्यात या मुलांना आत्मप्रतिष्ठेने जगता आलं पाहिजे. दुर्दैवाने आज समाजात अशा मुलांची टिंगळटवाळी केली जाते. खेडेगावात, ग्रामीण भागात अशा मुलांना विशेष मुलांच्या शाळेत घातलं जात नाही. ती बिचारी घरीच कुढत बसतात. म्हणूनच सहवासने गरीब पालकांच्या मुलांचं पालन - पोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

सहवासच्या आजवरच्या यशाचं अजून एक गमक म्हणजे आमच्याकडे असलेल्या मुलांच्या कुटुंबीयांचा आम्हाला मिळालेला पाठिंबा. आपल्या मुलांना सहवासमध्ये दाखल केल्यानंतर पालकांना सहवासाच्या नि:स्वार्थ सेवेची जाणीव होते आणि ते देखील या उत्तम उपक्रमाचा भाग होतात. तसेच, आमचे प्रमुख मार्गदर्शक आधार एनजीओचे प्रमुख मा. विश्वास गोरे सर यांचं सहवास संस्था मोठी होण्यात मोठं योगदान आहे. आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली आमची वाटचाल सुरु आहे. अशाच मार्गदर्शक आणि दानशूर व्यक्तिंच्या सहाय्याने आम्ही इथून अजूनही पुढे नक्कीच जाऊ शकतो याचा मला विश्वास आहे.

(शब्दांकन -संकेत सबनीस)

सहवास बहुउद्देशीय संस्था
सोनबर्डी, पो. हनुमंतखेडे,
ता. एरंडोल, जि. जळगांव
पीन - ४२५१०९.
e-mail : sahwasacare77@gmail.com
samadhansawant676@gmail.com
मो. : ७७४४०९१२९१ / ९३५६४०९७१०

